Vol. XII
Number-20

ISSN 2319-7129
(Special Issue) April, 2018

UGC Notification No. 62981

EDU WORLD

A Multidisciplinary International
Peer Reviewed/Refereed Journal

APH PUBLISHING CORPORATION

स्त्री सबलीकरणा करता 'कौटुंबीक हिंसा आणि प्रतिबंधक कायदा' 2005

डॉ. अनुराधा एम. खाडे*

प्रस्तावना

कुटुंब संस्था ही समाजव्यवस्थेचा मुलभूत पाया आहे. स्त्री व पुरुष हे कुटूंब संस्थेचे महत्वपूर्ण असे दोन चाके आहेत. पुरुषांच्या जिवनामध्ये स्त्रीचे स्थान अत्यंत अर्थपूर्ण, प्रभावशाली व महत्वाचे मानण्यात येवू ला.गले आहे. परंतु प्राचीन वैदिक काळात स्त्रीला तीच्या हक्कापासून वंचीत ठेवण्यात आले होते. पुरूष वर्गाचा स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोण अत्यंत कनिष्ठतेचा होता तसेच स्मृतीकाळ किंवा मनुपूर्वकाळात स्त्रीयाना दास्यत्वाच्या बंधनात जखडून टाकण्यात आले होते. मनुने किंवा त्याच्या स्मुतीने स्त्रीयांना अजिबात स्वातंत्र्य दिले नाही एवढेच नाही तर स्त्रीयांना पशुतुल्य, त्यांना मारण्याचा हक्क पुरुषाला प्रदान केल्या होता म्हणजेच या काळात स्त्रियाची स्थिती दयनिय होती त्याचप्रमाणे हिंदू संस्कृतितील स्त्री विधवा पुनर्विवाह बदी, दास्यत्व, सतिप्रथा, बालविवाह, देवदासी प्रथा यासारख्या अमानुष प्रथा व परपरानी जखडुन गेली होती. स्त्रीला गुलाम म्हणून जगण्याच्या गलिकडे कोणताच आधार नव्हता विशेषत: पुरूषासमोर स्त्रीची काहीच चालत नसे स्त्रीयांच्या वाटयाला फक्त लाचारीचे जीवन जगण्याशिवाय काहीच उरले नव्हते. हिंदू समाजातिल स्त्री वर्ग हा हजारो वर्ष दास्यत्वाच्या बंधनात बंदिस्त होता.

आज 21 व्या शतकात आपल्याला असे अनेक प्रश्न भेडसावत आहेत. कारण समाजात बलात्कार, विनयभंग, एकतर्फी प्रेमातुन बळी गेलेल्या मुली, नवऱ्याच्या जाच्याला कंटाळून आत्महत्या करणाऱ्या स्त्रीया पती किंवा पतीच्या नातेवाईकाकडून भारल्या जाणाऱ्या स्त्रीया, आदीवासी ग्रामीण, नागरी स्त्रीयांवर होणारे अन्याय, अत्याचार याची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आह. वर्तमान पत्रातील मथडयाखाली एकतरी अशी बातमी नियमित वाचायला मिळते आणि डोक्यात विचाराचे चक सुरू होते.

शोध निबंधाचे उद्देश

1. कौटुंबिक हिंसेचे स्वरूप समजून घेणे.
2. कौटूंबिक हिंसा आणि प्रतिबंधक कायदा - 2005 याचे स्पष्टीकरण करणे.
3. हिंसाचाराची गंभीरता समजून घेणे.
4. कौटूंबिक हिंसा कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

अध्ययन पध्दती :- प्रस्तुत शोध निबंधात वर्णनात्मक अध्ययन पध्दतीचा अवलंब करून दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करून आशय विश्लेशण पध्दतीचा वापर केला आहे.

कौटूंबिक हिंसेचे स्वरूप :- कौटूंबिक हिंसेच्या बाबीत स्त्रियांच्या विभिन्ना सामाजिक समस्यांचे अध्ययन सामाजिक शास्त्रामध्ये झाले आहे व होत आहे. स्त्रियांचे प्रश्न व समस्या हा विषय अलीकडच्या काळात केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजना, गैरसरकारी स्वयंसेवी संस्था (एन. जी. ओ.) संशोधन अध्ययनकर्ते या सर्वांच्या आकर्षणाचा विषय झाला

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, स्व. नि. पा. वाघाये कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय लाखनी., जि. भंडारा (महा.)

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N.P.W. College, Lakhani
Ref No.....
Dt.
Dist. Bhandara

आहे. असे असूनही स्त्रियांच्या एक महत्वपूर्ण प्रश्नाकडे म्हणावे त्याप्रमाणात लक्ष देण्यात आलेले नाही. ती समस्या म्हणजे स्त्रियांविरूध्दच्या कुटुंबातर्ग हिंसाचाराची समस्या होय. भारतीय स्त्रिया प्रदिर्घकाळापासुन अपमान, अवहेलना, यातना व शोषन यापासून संरक्षण करण्यासाठी काही महत्वूपर्ण नवीन कायद्याची निर्मिती झाली. स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाला. यशस्वी पुरुषाच्या जीवनात आणि कुटूंबात स्त्रीचे स्थान महत्वपूर्ण असते हा विचार भारतीय जनमानसात हळूहळू रूजू लागला. तरीही संपूर्ण भारतीय समाजात स्त्रियांविरूध्दचा कुटूंबातर्गत हिसांचाराच्या प्रमाणात फारशी घट झालेली नाही. म्हणून या समस्येचा प्रारंभ हिंसाचाराचा अर्थ समजून घेण्यापासून करणे इष्ट ठरेल.

हिंसाचार म्हणजे काय ? :- हिंसा ही शारीरिक वा मानसिक अशा दोन्ही प्रकारची असू शकते. शारिरिक हिंसेप्रमाणेच मानसिक हिंसा देखील नंदनियच आहे. हिंसाचाराची स्पष्ट व्याख्या करणे कठीन आहे. कारण अभ्यासक शारीरिक मारहाणी सारख्या ज्या कृत्यामधून दुसऱ्याच्या शरीराला प्रत्यक्ष इजा होते. अशा कृत्याला हिंसक कृत्य असे म्हणतात. हिंसाचार या संज्ञेच्या अर्थामध्ये शारीरीक इजेसोबत मानसिक इजा किया मनावरील आघात या दोन्ही गोष्टीचा समावेश होतो. त्यामुळे काही अभ्यासक ज्या कृत्यामुळे दुसऱ्या व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर आघात होतो किंवा आक्रमण होते अशा कृत्यांना हिंसक कृत्य असे म्हणतात. काही अभ्यासकांच्या मते :-

"राजरोस किंवा अप्रत्यक्ष मार्गाचा अवलंब करून सत्ता, संपत्ती, बळ यासारख्या सामर्थ्याच्या आधारे आपणास हवी असणारी गोष्ट, दुसऱ्याची इच्छा नसतांना तिच्याजवळून हिसकावुन घेण्यासाठी केलेले कृत्य म्हणजे हिंसाचार होय."

वरील व्याख्येनुसार अपहरण, बलात्कार, हत्या, लैगिक शोषन, मारहान, छेडखानी ही सर्व हिंसाचाराची कृत्य ठरतात.

भारतातील हिंसाचाराचे वास्तविक रूप :- आज कौटूंबिक हिंसा हा खूप गंभीर प्रश्न झालेला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या लोकसंख्या फंडाच्या अहवालानुसार भारतातील 6 कोटी मुली बेपत्ता आहेत. दर 54 मिनीटात एका स्त्रीवर बलात्कार आणि दररोज 14 स्त्रीया नवऱ्याकडुन ठार मारल्या जातात. तर तीन स्त्रियांमागे एका स्त्रिला नवऱ्याकडुन अथवा कुटूंबातील पुरुषाकडून लैंगिक अत्याचार सहन करावा लागतो. ही आकडेवारी भारताच्या संदर्भात असली तरी कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आढळतो.

भारतीय राष्ट्रीय अपराध अभिलेख ब्युरोच्या 2006 च्या अहवालानुसार प्रत्येक 26व्या मिनीटाला एक विनयभंगाची घटना, दर 54 मिनीटाला एका स्त्रीवर बलात्कार, दर 42 मिनीटाला एक लैंगिक छळ, प्रत्येक 43 मिनीटाला एका स्त्रीचे अपहरण, दर 93 मिनिटाला एका स्त्रीचा खुन होतो. सन 2005 मधील एकुण स्त्रीयावरील 1,55,553 हिंसेच्या प्रकरणापैकी 68,810 प्रकरणे कौटूंबिक हिंसाचाराची होती. महाराष्ट्रात काईन ब्लाक च्या निर्देशनावरून 2006 पर्यंत दररोज एक हुंडाबळी, दर तासात एका स्त्रीवर दोन गुन्हे दर दोन तासाला एक स्त्रिला नवरा आणि नातेवाईकाकडून होणाऱ्या त्रासाला बळी पडावे लागते. तर तीन तासाला विनयभंग घडून येतो.

राष्ट्रीय नोंदणी विभागाने केलेल्या अहवालानुसार स्त्री विरूध्द हिंसाचाराचे प्रमाण 14.4% इतके आहे. महाराष्ट्रात अशा घटनांचे प्रमाण 14.3% असून, मध्यप्रदेश, 12.9%, उत्तरप्रदेश 11.8% असा कम लागतो, दिल्लीत हे प्रमाण 23.55% तर राजस्थानात 21.5% आहे. कौटूंबिक हिंसाचारात कुटूंबातील इतर स्त्रियांबरोबरचा व्यभीचार इत्यादी घटनांच्या तकारी सहसा नोंदविण्यात येत नाहीत. कुटूंबाअंतर्गत स्त्रीयर होणारा अत्याचार किंवा हिंसात्मक घटना भारतीय संस्कृतीत वाढलेल्या स्त्रीया पोलिस स्टेशनपर्यंत घेऊन जात नाही. त्यामुळे या हिंसात्मक घटना बहुधा छुप्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात आढळून येतात याची आकडेवारी प्राप्त करणे कठीण बाब आहे.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

कौटूंबिक हिंसा प्रतिबंध करण्याचे उपाय

कौटुंबिक हिंसा प्रतिबंधक कायदा 2005 या कायदयाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे,

1. हा मुख्यत्वे दिवाणी कायदा आहे. तरीही यात काही विशिष्ट टप्यावर फौजदारी कायदयाची मदत घेता येते. दोन्ही प्रकारच्या तरतुदीचा एकत्रीत उपयोग हा भारतात प्रथमच होत आहे.
2. या कायदयामुळे मानसिक व शाब्दीक छळापासून स्त्रीला संरक्षण मिळते.
3. यामध्ये स्त्री ला हिंसाविरहीत जीवन जगण्याचा अधिकार आहे हा विचार पायाभूत आहे. परीणामी सर्व प्रकारच्या कौटूंबिक हिंसेला पायबंद घालण्याची तरतुद या कायद्यात आहे. मुख्य म्हणजे राहत्या घरावरच तिचा मालकी हक्क नसला तरीही घरातुन तीला बाहेर काढता येत नाही.
4. कौटूंबिक हिंसा व्याख्येची व्याप्ती वाढवीली आहे फक्त हुंडयापायी होणारा जाचच नव्हे तर शारिरीक व मानसिक हिंसेसह आर्थिक व लैंगिक हिंसाही लक्षात घेतली आहे.
5. कौटुंबिक नातेसंबंध या व्याख्येत आई. मुली, बालीका, पत्नी, विधवा सून आणि लग्नासारख्या नातेसंबंधात असलेल्या स्त्रीया या सर्वांचा समावेश आहे.

सारांश

भारतीय समाजात हजारो वर्षापासुन स्त्रीयांना दुय्यम वागणूक देण्यात आली आहे. तसेचदेण्यात येत आहे. त्यामुळे स्त्रियांना अवहेलना, शोषण, अन्याय, अत्याचार इत्यादी गोष्टींना बळी पळावे लागते. म्हणून महिलांच्या वैयक्तीक, सामाजिक विकास व्हावा, महिला अधिकं सबळ व्हाव्यात व्यासाठी हा कायदा महत्वाचा टप्पा मानला जात आहे. या कायदयाची अंमलबजावणी करण्याच्या यंत्रणेने जबाबदारीपूर्वक संवेदनशिलतेने व सात्यत्याने विवेक बुध्दीने वापर करून योग्य शाहानिशा करून कोणावरही अन्याय होणार नाही ही काळजी घेणे अपेक्षित आहे. त्याशिवाय महिलांची प्रगती व विकास शक्य नाही.

संदर्भ ग्रंथ सूची

1. प्रा.पी.के.कुलकर्णी 2013, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
2. डॉ.बी. एम. करावे, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे अंड कं. पब्लिशर्स, नागपूर
3. डॉ.प्रदीप आगलावे , भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, साईनाथ पब्लिशर्स , नागपूर.
4. डॉ.शुभांगी गव्हाणे , महिला सबलीकरण, वरद पब्लिकेशन, औरंगाबाद.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani Bhandara
N.P.W. College, Lakhani
Ref No.
Dt.
Distt. Bhandara